# महागाईचा पुन्हा धोका

## तेलाच्या दरवाढीचा परिणाम

**ईटी वृत्त,** नवी दिल्ली

केंद्रात सत्ताबदल झाल्यापासून सातत्याने खनिज तेलाचे दर आंतरराष्ट्रीय बाजारात खाली येत होते. त्यामुळे सरकारच्या प्रत्येक सुधारणेला चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळत असल्याचे दिसत होते. परंतु गेल्या काही आठवड्यांपासून तेलाचे दर वाढू लागल्यामुळे आगामी काळात महागाईचा धोका मोठ्या प्रमाणावर निर्माण झाला आहे. याची झळ सर्वसामान्यांना बसणार आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारात इंधनांचे दर प्रति बॅरल ५० डॉलरपर्यंत खाली घसरले होते. परंतु जूनपासून हे दर प्रति बॅरल ६५ डॉलरपर्यंत चढले. इंधनांचे दर खाली आले असताना सरकारला वित्तीय तूट आटोक्यात ठेवणे व अनुदाने कमी करणे शक्य झाले होते. मात्र आता इंधनाचे दर ३३ टक्क्यांनी वाढले असल्यामुळे महागाई एकूण सुमारे ०.३ टक्क्यांनी वाढेल, असे भाकित रिझर्व्ह बँकेने आपल्या एका अहवालात नुकतेच वर्तवले आहे. यामुळे आर्थिक विकास ०.१५ टक्क्यांनी कमी होईल, असेही सांगण्यात येत आहे.

देशाला डिजिटायझेशनकडे नेऊ पाहणाऱ्या तसेच जीएसटी लागू करून अप्रत्यक्ष करांचे सुसूत्रिकरण करणाऱ्या सरकारसाठी ही स्थिती घातक ठरणार आहे. महागाईचा नवा निर्देशांक सोमवारी जाहीर होणार असून त्यातून चित्र अधिक स्पष्ट होणार आहे. केंद्र सरकार सत्तेत आले त्यावर्षी म्हणजे मे २०१४मध्ये ब्रेन्ट क्रूड तेल प्रति बॅरल १०० डॉलर किंमतीला उपलब्ध होते. लगेचच जून २०१४पासून त्या दरात सातत्याने घट होत गेली. २०१६मध्ये हे खनिज तेल प्रति बॅरल ३० डॉलर इतके खाली आले. मात्र आता हा दर वाढत असल्याने महागाईची टांगती तलवार भारतीयांवर यापुढेही राहणार आहे.




### असे झाले बदल

- **कच्च्या खनिज तेलाच्या दरात वाढ झाल्यामुळे गुरुवारी (९ तारखेला) सरकारच्या १०वर्षीय बाँडवर ६.९३ टक्क्यांऐवजी सात टक्के उत्पन्न मिळाले.**
- **ग्राहकोपयोगी वस्तूंच्या किंमतींत ऑक्टोबरमध्ये वार्षिक तुलनेत ३.४ टक्के वाढ. यापूर्वी सप्टेंबरमध्ये ही वाढ ३.२८ टक्के होती.**
- **एप्रिल ते सप्टेंबर याकाळात घाऊक किंमत निर्देशांक २.५० टक्के. मात्र याच काळात देशाचे तेलाचे बिल सुमारे १७ टक्क्यांनी वाढले.**

### अर्थनोंद

- **१३ नोव्हेंबर :** मनी मास्टर्स लिझिंग अँड फायनान्स देणार १:४ बोनस इश्यु. अंतरिम लाभांश – गुजरात पिपावाव पोर्ट लि. (१.७० रु.), लार्सन अँड टुब्रो इन्फोटेक (८ रु.), सुंदरम् फास्टनर्स (१.९० रु.).
- **१४ नोव्हेंबर :** अंतरिम लाभांश – एलअँडटी टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस (४ रु.), श्रीराम सिटी युनियन फायनान्स (६ रु.).
- **१६ नोव्हेंबर :** अंतरिम लाभांश – भारत रोड नेटवर्क (०.५० रु.), अमृतांजन हेल्थकेअर (१.१० रु.), बाळकृष्ण इंडस्ट्रीज (२.५० रु.), भारत फोर्ज (२ रु.), डीसीएम श्रीराम (४ रु.), गेटवे डिस्ट्रीपार्क्स (३ रु.), नीलकमल (४ रु.), पेज इंडस्ट्रीज (३५ रु.).
- **१७ नोव्हेंबर :** अंतरिम लाभांश – क्युपिड (२ रु.), हिंदुजा ग्लोबल सोल्युशन्स (२.५० रु.), इंगरसोल रँड इंडिया (३ रु.), एमएएस फायनान्शियल सर्व्हिसेस (१.५० रु.).

# 'पीएमसी'शी चर्चा गरजेची

**आमची महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण उच्च उत्पन्न गटांतर्गत, मालकी हक्क हस्तांतरित (MHADA HIG, conveyance) सहकारी गृहनिर्माण संस्थेची मोडकळीस आलेली इमारत आहे. चार वर्षांपूर्वी ७९(ए) अनुसार आम्ही पुनर्विकास प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC). नियुक्त केला आहे, पण गेली चार वर्षे आम्ही ३३(५) अधिसूचनेच्या प्रतीक्षेत होतो. दिनांक ३ जुलै २०१७ रोजी ३३(५) ची अधिसूचना (GR) आली, पण आमच्या सल्लागारांच्या मते शासनाने फुटकळ जमीन (titbit) वितरित करण्यावर सध्या स्थगिती दिली आहे. आमच्या सल्लागारांच्या मते, सध्याचा इमारतीचा आकार (layout) इंग्रजी 'C' अक्षराप्रमाणे असल्यामुळे फुटकळ जमिनी (titbit) संदर्भात शासनाचे धोरण येईपर्यंत पुनर्विकास होऊ शकत नाही व ते (सल्लागार) व्यवहार्यता अहवालही (feasibility report) देऊ शकत नाहीत. आमचे प्रश्न असे की, आमच्या इमारतीचा पुनर्विकास करण्यासाठी काही मार्ग आहेत का? 'C' आकारात हस्तांतरित झालेली इमारत पुन्हा 'C' आकारातच बांधणे बंधनकारक आहे का? कृपया मार्गदर्शन करावे, जेणेकरून आम्ही पुनर्विकासाची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करू शकू.**

\- प्रणव साळवी व पराग पाटील, कुर्ला (पूर्व) मुंबई



### शंकासमाधान



पुनर्विकास
चंद्रशेखर प्रभू
आर्किटेक्ट

आपण म्हणता त्याप्रमाणे आपण चार वर्षांपूर्वी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार, म्हणजे पीएमसी नेमला. पीएमसीचे नेमके काम म्हणजे ज्या दिवशी त्यांची नेमणूक केली जाते, त्या दिवशीची सद्यस्थिती समजून व कायद्याचा अभ्यास करून व्यवहार्यता, फिजिबिलिटी रिपोर्ट देणे. शासनाची धोरणे सतत बदलत असतात. धोरणात बदल होण्याची वाट पाहणे हे पीएमसीचे काम नव्हे. ज्या दिवशी नेमणूक होईल, त्या दिवशी जे धोरण असेल, त्याप्रमाणे रिपोर्ट देणे हे त्यांचे काम आहे. जसजसे धोरण बदलेल, तसतसे नवे फिजिबिलिटी रिपोर्ट पीएमसीने द्यायला हवेत. आपल्याप्रमाणे अनेक सहकारी संस्थांनी पीएमसी नेमले व गेल्या चार वर्षांत जेव्हा धोरणे बदलली तेव्हा तेव्हा नव्या धोरणाप्रमाणे फिजिबिलिटी रिपोर्ट दिले आहेत. आपल्याबाबतीत असे रिपोर्ट दिले गेले नसतील, तर हे आश्चर्यकारकच नव्हे, तर धक्कादायक आहे. चार वर्षे कोणत्या ना कोणत्या कारणाने पीएमसी रिपोर्ट देत नसेल, तर अशा पीएमसीशी कसा आणि किती व्यवहार करावा यावर आपल्या सहकारी संस्थेने निर्णय का घेतला नाही? सबब, पीएमसीने आपले कर्तव्य पार पाडले नसेल, तर ते गृहनिर्माण संस्थेने पार पाडायला हवे. आपल्याबाबत दोन्ही बाबी पार पाडल्या गेलेल्या नाहीत.

आता टिटबिटचा विषय. म्हाडाच्या ज्या वसाहती आहेत, त्यातील ज्या इमारती आहेत, त्या इमारतींना ज्या जमिनी दिल्या गेल्या आहेत, त्या जमिनी सोडून ज्या उर्वरित जागा आहेत, त्या छोट्या भूखंडांना टिटबिट म्हणतात. पूर्वी इमारतींच्या सहसा लगतच असलेले हे टिटबिट भूखंड लगतच्या इमारतींना देण्याची पद्धत होती. मग नव्या धोरणानुसार हे टिटबिट भूखंड सोसायट्यांना देण्याऐवजी त्या पूर्ण 'ले आऊट'मध्ये अतिरिक्त एफएसआय समजून वसाहतीतील सर्व इमारतींना समान हिश्शाने वाटून देण्याचा निर्णय झाला. या पद्धतीला 'प्रो राटा' म्हणतात. एखाद्या वसाहतीचा 'ले आऊट' मंजूर झाला, की त्या वसाहतीत किती अतिरिक्त एफएसआय आहे याचा अंदाज येतो आणि त्याचे वाटप कसे करायचे, याचाही अंदाज येतो. मुंबई महापालिकेने अनेक ठिकाणी 'ले आऊट' मंजूर केलेला नाही, तरीही 'प्रो राटा एफएसआय' किती मिळेल याचा अंदाज पीएमसीला असतो. आपल्या वसाहतीत किती 'प्रो राटा' एफएसआय मिळू शकेल याचा अंदाज आपल्या पीएमसीने दिला पाहिजे. तो देत नसेल,तर आपण तो त्याच्याकडून घ्यावा. अजूनपर्यंत 'टिटबिट' व 'प्रो राटा'चा अंदाज त्याने आपल्याला दिला नाही, हे आश्चर्यकारक आहे. आतापर्यंत अशा वसाहतीतील प्रकरणे आम्ही हाताळली आहेत, परंतु असे उदाहरण पाहिले नाही.

आपण असेही म्हटले आहे, की आपली इमारत इंग्रजी 'C' आकाराची आहे. या संदर्भातही पीएमसीचा अभिप्राय ऐकून आश्चर्य वाटले. जर इमारतीचा आकार हवा तसा नसेल, तर महापालिका आयुक्तांकडून काही सवलती आपणास मिळू शकतील. जमिनीचा आकार, क्षेत्रफळ याची माहिती दिली असती तर, सविस्तर चर्चा करता आली असती. वास्तविक पीएमसीशी आपली अशी चर्चा होणे गरजेचे होते. आपण तशी ती करावी. आपल्या इमारतीचा पुनर्विकास शक्य आहे. मात्र आपणास किती जागा मिळावी याबाबतीत सविस्तर माहिती पीएमसी देऊ शकेल. चार-चार वर्षे जर ही माहिती मिळत नसेल, तर कायद्याप्रमाणे जी कारवाई शक्य आहे, ती आपण करावी. त्या अनुषंगाने कायदेशीर सल्ला घेऊन वाटचाल करावी.


**Siyaram's** PREMIUM SUITINGS & SHIRTINGS

## SIYARAM SILK MILLS LTD.

CIN : L17116MH1978PLC020451

Regd. Office: H-3/2, MIDC 'A' Road, Tarapur, Boisar, Dist. Palghar, PIN 401 506 (M.S.),
Phone - 02525-329910, Fax -02525-272475 Email sharedept@siyaram.com, Website - www.siyaram.com

**EXTRACT OF THE STANDALONE UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER / HALF YEAR ENDED 30TH SEPTEMBER, 2017.**

(₹ In Lakhs)

| PARTICULARS | Quarter Ended (Unaudited) | | | Half Year Ended (Unaudited) | | Year Ended (Audited) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **30.09.2017** | 30.06.2017 | 30.09.2016 | **30.09.2017** | 30.09.2016 | 31.03.2017 |
| Total Revenue | **42,822** | 32,482 | 42,918 | **75,304** | 71,749 | 159,943 |
| Net Profit After Tax | **3,073** | 1,035 | 2,581 | **4,108** | 3,402 | 9,101 |
| Total Comprehensive Income | **3,049** | 1,026 | 2,508 | **4,075** | 3,303 | 9,047 |
| Paid up Equity Share Capital (Face value of ₹10 per share) | **937** | 937 | 937 | **937** | 937 | 937 |
| Other Equity Excluding Revaluation Reserves | **-** | - | - | **-** | - | 58,723 |
| Earnings Per Share for the Period (₹) (Not Annualized) | **32.79** | 11.04 | 27.55 | **43.82** | 36.29 | 97.09 |

**Notes :**

1. The above results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their meeting held on 11/11/2017.
2. As approved by the Members of the Company in the Annual General Meeting, the Equity Shares of the Face Value of Rs.10/-each has been sub-divided into 5 Equity Shares of Rs.2/- each with effect from 26th October, 2017 i.e. Record Date. Earning per share has been calculated in the above result by considering the face value of equity share of Rs. 10 each.
3. During the Quarter, the Company has formed wholly owned foreign subsidiary namely 'CADINI S.R.L. at Italy. There were no operation in the said subsidiary during the quarter.
4. The above is an extract of the detailed format of quarterly financial results filled with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulation, 2015. The full format of quarterly financial results are available on the Stock Exchange websites, www.nseindia.com and www.bseindia.com and on the Company's website www.siyaram.com

For SIYARAM SILK MILLS LTD.
Sd/-
(Ramesh Poddar)
Chairman & Managing Director

Place : Mumbai
Date : 11th November, 2017.

OXEMBERG | J.HAMPSTEAD WORLD'S FINEST FABRIC & APPAREL | MiSTAIR IMPACT DRESSING A quality product from Siyaram's | Siyaram's SIYAA FOR WOMEN | Siyaram's ROYALÈ LINEN premium linen fabric



## GODFREY PHILLIPS INDIA LIMITED

**CIN: L16004MH1936PLC008587;**
**website:www.godfreyphillips.com; email: isc-gpi@modi.com**
**Extract of Standalone Unaudited Financial Results for the Quarter and Half Year ended September 30, 2017**

(Rs. in lakhs)

| Sl. No. | Particulars | Quarter ended 30.9.2017 | Half Year ended 30.9.2017 | Quarter ended 30.9.2016 |
|---|---|---|---|---|
| 1 | Total Income from Operations | 65428 | 169336 | 102054 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 8361 | 7870 | 2979 |
| 3 | Net Profit/(Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 8361 | 7870 | 2979 |
| 4 | Net Profit/(Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 5880 | 5566 | 1970 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 5782 | 5370 | 1903 |
| 6 | Equity Share Capital | 1040 | 1040 | 1040 |
| 7 | Basic and Diluted Earnings per Share (of Rs.2 each) (not annualised) (Rs.) | 11.31 | 10.71 | 3.79 |

**Note:**

1. Consequent to introduction of Goods and Services Tax (GST) with effect from July 1, 2017, Central Excise [other than National Calamity Contingent Duty (NCCD) on cigarettes and chewing tobacco] and Value Added Tax (VAT) have been subsumed into GST. In accordance with Indian Accounting Standard – 18 on Revenue and Schedule III of the Companies Act, 2013, levies like GST, GST Compensation Cess and VAT are not included in Gross Revenue from sale of products. Accordingly, Gross Revenue from sale of products and Excise duty for the quarter and half year ended September 30, 2017 are not comparable with the previous periods.
2. The above is an extract of the detailed format of Statement of Standalone Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The detailed financial results and this extract were reviewed by the Audit Committee and approved at the meeting of the Board of Directors of the Company held on November 11, 2017. The full format of the Statement of Standalone Unaudited Financial Results are available on the Company's website (www.godfreyphillips.com) and on the websites of National Stock Exchange of India Limited (www.nseindia.com) and BSE Limited (www.bseindia.com).
3. The Limited Review, as required under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, has been completed on the detailed financial results for the Quarter and Half Year ended September 30, 2017 and the Limited Review Report of the Auditors has been filed with the Stock Exchanges. This Report does not have any impact on the 'Results and Notes' for the Quarter and Half Year ended September 30, 2017 which needs to be explained.

**Registered Office:** 'Macropolo Building', Ground Floor, Dr. Babasaheb Ambedkar Road, Lalbaug, Mumbai - 400 033.

**For and on behalf of the Board**
**Sd/-**
**(K.K. Modi)**
**Managing Director**

Place: New Delhi
Dated: November 11, 2017



IL&FS | प्रायव्हेट इक्विटी

## आयएलअँडएफएस इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : दि आयएलअँडएफएस फायनान्शियल सेंटर, प्लॉट क्र. सी–२२,जी ब्लॉक, वांद्रे–कुर्ला संकुल, वांद्रे (पू.), मुंबई – ४०० ०५१.
टे नं : +९१–२२–२६५३३३३३ फॅक्स नं : +९१–२२–२६५३३०५६ वेबसाईट: www.iimlindia.com ई–मेल : investor.relations@ilfsindia.com
CIN : L65999MH1986PLC147981

**३० सप्टेंबर २०१७ रोजी संपलेल्या अर्धवर्षासाठीच्या एकत्रीकृत वित्तीय निष्कर्षांमधील सारांश**

(₹ लाख मध्ये)

| तपशील | ३०.०९.२०१७ रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित) | ३०.०९.२०१७ रोजी संपलेले अर्ध वर्ष (लेखापरीक्षित) | ३०.०९.२०१६ रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित) | ३१.०३.२०१७ रोजी संपलेले वर्ष (लेखापरीक्षित) |
|---|---|---|---|---|
| एकूण महसूल | **२,९२६.५२** | ६,०३४.२४ | २,७५६.८५ | ११,५१३.९० |
| सर्वसाधारण कामकाजापासून कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा | **६७७.५०** | १,३२६.९६ | ८९.१९ | १,३८८.१० |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा (असाधारण बाबीनंतर) | **६७७.५०** | १,३२६.९६ | ८९.१९ | १,३८८.१० |
| कालावधीसाठी करोपरान्त निव्वळ नफा /(तोटा) (सर्वसाधारण बाबी आणि अल्पधारकांचे हित यांच्यानंतर) | **२४६.४९** | ७४३.०२ | (२७२.०७) | ६१२.५६ |
| समभाग भांडवल | **६,२८०.८५** | ६,२८०.८५ | ६,२८०.८५ | ६,२८०.८५ |
| राखीव (पुनर्मुल्यांकन वगळून राखीव आधीच्या वर्षाच्या ताळेबंदामध्ये दाखविल्यानुसार ) | | | | २४,६०८.३२ |
| प्रती समभाग मिळकत (सर्वसाधारण बाबींपूर्वी) (प्रत्येकी ₹ २/– दर्शनी मूल्य) मूलभूत आणि सौम्यीकृत | **०.०८** | ०.२४ | (०.०९) | ०.२० |
| प्रती समभाग मिळकत (सर्वसाधारण बाबीनंतर) (प्रत्येकी ₹ २/– दर्शनी मूल्य) मूलभूत आणि सौम्यीकृत | **०.०८** | ०.२४ | (०.०९) | ०.२० |

**नोंदी :**

१. आयएल अँड एफएस इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्स लिमिटेडच्ये ('कंपनी') स्वतंत्र आणि एकत्रीकृत वित्तीय निष्कर्ष लेखापरीक्षण समितीने पुनर्विलोकित केले असून संचालक मंडळाने आपल्या दि. १० नोव्हेंबर, २०१७ रोजी आयोजित सभेमध्ये संमत केले आहेत. ३० सप्टेंबर, २०१७ रोजी संपलेल्या अर्धवर्षाच्या निष्कर्षांचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे आणि ३० सप्टेंबर, २०१७ रोजी संपलेल्या तिमाहीच्या निष्कर्षांचा कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी मर्यादित आढावा घेतलेला आहे.

२. वर दिलेली माहिती ही सेबीच्या (लिस्टिंग ऑण्ड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसकडे दाखल केलेल्या तिमाही अखेरच्या सविस्तर वित्तीय निष्कर्षांचा सारांश आहे. अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांची संपूर्ण विहित स्वरूपातील माहिती http://www.nseindia.com आणि http://www.bseindia.com वरील स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईट्सवर उपलब्ध आहे. ही माहिती कंपनीच्या वेबसाईट http://www.iimlindia.com/financials.aspx वर सुद्धा उपलब्ध आहे.

३. स्वतंत्र वित्तीय निष्कर्षां विषयीची अतिरीक्त माहिती खालीलप्रमाणे आहे :

(₹ लाख मध्ये)

| तपशील | ३०.०९.२०१७ रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित) | ३०.०९.२०१७ रोजी संपलेले अर्ध वर्ष (लेखापरीक्षित) | ३०.०९.२०१६ रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित) | ३१.०३.२०१७ रोजी संपलेले वर्ष (लेखापरीक्षित) |
|---|---|---|---|---|
| एकूण महसूल | **१,६१४.३७** | २,७०५.३९ | २,८०३.११ | ६,८८८.४१ |
| करपूर्व नफा | **७४७.५३** | ८९८.८६ | १,६४१.०४ | २,८१२.७८ |
| करोपरान्त नफा | **५४६.०९** | ६५८.५० | १,२७२.६४ | २,३९७.०४ |

संचालक मंडळाच्या आज्ञेवरून

**सही/–**
**रमेश बावा**
**व्यवस्थापकीय संचालक**

स्थळ : मुंबई
तारीख : १० नोव्हेंबर, २०१७

ILFS-IM / 95 / PREM ASSOCIATES - MAR